जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
31 JUL 2017
लोकमत

# विद्यापीठात उद्या कानडे यांचे व्याख्यान

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठातील साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे अध्यासन केंद्राच्या वतीने दि. १ ऑगस्ट रोजी व्याख्यानाचे आयोजन केले आहे. 'अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य' या विषयावर प्रसिद्ध साहित्यिक लहू कानडे (अहमदनगर) यांचे विशेष व्याख्यान होणार आहे. वि. स. खांडेकर भाषा भवन येथे सकाळी ११ वाजता हे व्याख्यान होणार असून, अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे असतील.

अध्यासन स्थापनेमागे अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यावर संशोधन आणि समाजातील शोषित, वंचित, दलित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करणे ही उद्दिष्टे आहेत. अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी त्यांच्या साहित्यावर राज्यस्तरीय, राष्ट्रीय चर्चासत्रांचे आयोजन करण्यात येते. यावर्षी त्यांच्या साहित्यावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी विद्यार्थी व पालकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे मराठी विभागप्रमुख डॉ. राजन गवस यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
3 1 JUL 2017
पुण्यनगरी

# गणित अधिविभागामध्ये ५५ विद्यार्थ्यांचे रक्तदान

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठाची राष्ट्रीय सेवा योजना, गणित अधिविभाग, राजर्षी शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालय कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने गणित अधिविभागमध्ये रक्तदान शिबिर पार पडले. शिबिरामध्ये शिवाजी विद्यापीठातील वेगवेगळ्या अधिविभागांतील ५५ विद्यार्थी आणि शिक्षकांनी रक्तदान केले.

शिबिराचे आयोजन डॉ. एस. बी. भालेकर आणि एस. एस. कुंभार यांनी केले होते. प्रा. डी. के. गायकवाड, गणित अधिविभागप्रमुख प्रा. डॉ. एस. एच. ठकार, विद्यापीठाच्या मेडिकल ऑफिसर डॉ. व्ही. ए. रानडे यांनी मार्गदर्शन केले.

शिबिरात विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रसेवा जागृत करण्यासाठी गणित अधिविभागाने ओरिएंटेशन प्रोग्रॅम ऑन ब्लड डोनेशन अवेरनेस या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यासाठी शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालयातर्फे डॉ. दीपक बळवंतकर, डॉ. दीपिका सेनी, तंत्रज्ञ रेखा लोखंडे, रुबिना शरिफ मसलत आदी परिचारकांसह शशिकांत गुरव, राहुल धनवडे आणि राजू चैरे यांनी काम केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
3 1 JUL 2017
पुण्यनगरी

# विद्यापीठात उद्या व्याख्यान

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठाच्या अध्यासन केंद्राच्या वतीने मंगळवार, दि. १ ऑगस्ट रोजी अण्णा भाऊ साठे जयंतीनिमित्त 'अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य' या विषयावर साहित्यिक लहू कानडे (अहमदनगर) यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रमुख उपस्थिती कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांची आहे. दरवर्षी जयंतीनिमित्त त्यांच्या साहित्यावर राज्यस्तरीय, राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात येते. हे व्याख्यान वि. स. खांडेकर भाषाभवन सभागृहात सकाळी ११ वाजता होणार आहे.

31 JUL 2017
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# लोकसंस्कृतीचे साक्षेपी अभ्यासक : डॉ. विश्वनाथ शिंदे



शिवाजी विद्यापीठातील माजी मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. विश्वनाथ शिंदे यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त त्यांचा आज, सोमवारी दुपारी तीन वाजता राजर्षी शाहू स्मारक भवनात गौरव समारंभ होणार आहे. त्यानिमित्त...

डॉ. विश्वनाथ शिंदे यांनी शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागात दीर्घकाळ अध्यापन आणि संशोधनाचे कार्य केले आहे. डॉ. गो. मा. पवार व डॉ. ल. रा. नसिराबादकर हे या विभागातून सेवानिवृत्त झाल्यानंतर शिंदे सरांनी मराठी विभागप्रमुखपदाची जबाबदारी सांभाळली. त्याआधी त्यांनी तुळजापूर, कडेगाव येथे मराठीचे प्राध्यापक म्हणून कार्य केले होते. त्यांनी या विभागात अनेक विद्यार्थीभिमुख उपक्रम राबविले; अनेक चर्चासत्रे, व्याख्याने व कार्यशाळांचे आयोजन केले. सोलापूर, सांगली, सातारा, कोल्हापूर या परिसरांतून येणाऱ्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांशी व विभागांशी त्यांनी आस्थेचे व जिव्हाळ्याचे संबंध प्रस्थापित केले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली एम. फिल., पीएच.डी.च्या अनेक विद्यार्थ्यांनी नव्या विषयांवर संशोधन केले आहे.

विद्यापीठातील वृत्तपत्र व संज्ञापन विभागाचे काही काळ ते प्रभारी होते. त्याचबरोबर महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासनाची जबाबदारीही त्यांनी सांभाळली आहे. या सर्व जबाबदाऱ्यांतून त्यांचे बहुस्तरीय विद्यार्थ्यांशी सलोख्याचे संबंध स्थापित झाले आहेत. एम. ए.चा विद्यार्थी व सहकारी म्हणून त्यांचा सहवास मला लाभला. या काळात त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे व कार्यशैलीचे जवळून दर्शन झाले. त्यांच्या कामातील स्वयंशिस्त आणि स्वभावाच्या आंतरिक गुणांमुळे महाराष्ट्रातील जुन्या, नव्या पिढीतील अभ्यासक, साहित्यिकांशी मैत्रभाव जडले. त्याचा आनुषंगिक लाभ विविध व्याख्याने, चर्चासत्रे, विविध उपक्रमांतून विभागाला होत असे. 'लोकसाहित्य' हा त्यांचा विशेष अभ्यासाचा विषय आहे. त्यांचे या विषयातील पंधराहून अधिक ग्रंथ प्रसिद्ध झाले आहेत. लोकसाहित्याचा वाङ्मयीन अभ्यास हा त्यांचा प्रमुख दृष्टिकोन होता. पुढील टप्प्यावर ते संस्कृतिअभ्यासाकडे वळलेले आहेत.

डॉ. शिंदे यांनी लोकसंस्कृती, लोकसाहित्य आणि आधुनिक साहित्य यांच्यातील परस्पर संबंधांचा नवा अन्वयार्थ लावला आहे. विशेषत: पारंपरिक मराठी तमाशा आणि आधुनिक वगनाट्य यांतील सहसंबंधांचा त्यांचा अभ्यास नवा ठरला आहे. लोकरंगभूमीच्या विविध आविष्कारांचा, आधुनिक रंगभूमीवरील प्रभावाचा नव्या प्रकाशात त्यांनी शोध घेतलेला आहे. या दृष्टीने त्यांनी गिरीश कर्नाड व इतरही काही नाटककारांच्या नाटकातील लोकाविष्काराचा अनुबंध विश्लेषणात्मक स्वरूपात मांडला. तमाशातील 'मावशी'चा शोध ते वंगलोकरंगभूमीत शोधतात. पश्चिम महाराष्ट्रातील शाहिरी परंपरा आणि तिचे संकलन आणि संशोधन हा त्यांच्या अभ्यासाचा मुख्य विषय राहिला आहे. या दृष्टीने त्यांनी पश्चिम महाराष्ट्रातील अनेक अलक्षित, दुर्मीळ लोकशाहिरांच्या रचनांचा शोध घेऊन हे लेखन प्रकाशात आणले आहे. त्यांनी मराठी ऐकिवाचा, भेदिकांच्या या शाहिरी अभ्यासाला नवी दिशा दिली.

महाराष्ट्रातील शाहिरी वाङ्मयाच्या धारांचा अन्वयार्थ लावण्याबरोबरच ते नव्या पिढीला उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला. संस्कृतिअभ्यासात लोकदैवतांचा अभ्यास हा केंद्रावर्ती ठरू शकतो. या दृष्टीने अलीकडच्या काळात लोकदैवतांचा डॉ. शिंदे यांनी केलेला अभ्यास नवा ठरला आहे. खंडोबा, जोकमारस्वामी या लोकदैवतांबाबतचे त्यांचे लेखन ग्रंथरूपाने प्रकाशित आहे. समाजेतिहास, लोकश्रद्धाविश्वाच्या घडवणुकीतून लोकदैवतांचे समाजशास्त्र कसे आकारला येते, याचा वैशिष्ट्यपूर्ण विचार शिंदे सरांनी केला आहे. स्थानिक श्रद्धाविश्वाचे सामाजिक कोंदण उलगडून त्याची ते समाजमीमांसा करतात. त्यांच्या लोकसाहित्यविषयक कामाचे वेगळेपण महाविद्यालय, विद्यापीठ स्तरांवर लोकसाहित्यविषयक संशोधनाला चालना देणारे ठरले. दीर्घकाळाच्या अध्यापन कार्यातून शिंदे सर सेवानिवृत्त झाले आहेत. यापुढील काळातही ते संस्कृतिअभ्यासाला पोषक ठरेल अशी ग्रंथनिर्मिती करतील, असा विश्वास वाटतो.

- प्रा. डॉ. रणधीर शिंदे,
मराठी विभाग, शिवाजी विद्यापीठ

जनसंपर्क कक्ष
31 JUL 2017 महाराष्ट्र टाईम्स शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# साक्षेपी संशोधक



**महाराष्ट्रातील लोकसाहित्याचे महत्त्वाचे अभ्यासक, संशोधक आणि समीक्षक प्रा. डॉ. विश्वनाथ शिंदे यांच्या सेवानिवृतीनिमित्त आज (ता. ३१) गौरव समारंभ होत आहे. त्यानिमित्त त्यांच्या व्यक्तिमत्त्वाविषयी...**

महाराष्ट्राला लोकसाहित्याची मोठी परंपरा आहे. अनेक दुर्लक्षित क्षेत्रे लोकसाहित्याच्या अभ्यासकांनी उजेडात आणली आहेत. क्षेत्रीय आणि स्तरीय संशोधन करून धक्कादायक मतेही मांडली आहेत. अशा संशोधकात प्रा. डॉ. विश्वनाथ शिंदे यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागते.

लोकसाहित्यातील लोककला, श्रद्धा, भाषा, उत्सव यामधील नातेसंबंध संशोधनातून सिद्ध केले आहेत. लोककथा, लोकपरंपरेचे अनेक विषय त्यांनी वेगळ्या अंगांनी मांडले आहेत. प्रत्यक्ष वर्गात शिकल्याचा अनुभव त्यांच्याकडून आल्याने अध्ययन, अध्यापन यातून संशोधकवृतीचा शिक्षक आम्हाला अनुभवायला मिळाला.



शिंदेसरांचा नोकरीचा प्रवासही थक्क करणारा असून त्याची सुरवात बारामतीपासून, तुळजापूर, कडेपूर आणि शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागप्रमुखापर्यंत झालेली दिसते. गेली तेहतीस वर्ष ते अध्यापनाचे काम करत आहेत. विद्यापीठाच्या नियमित अध्यापनाबरोबर त्यांच्याकडे आजपर्यंत सतरा विद्यार्थ्यांनी पीएचडी प्राप्त केली आहे. लोकसाहित्य या क्षेत्रासाठी त्यांनी संपूर्ण आयुष्य वाहून घेतल्याने अध्यापनाच्या काळात दोन महत्त्वाचे संशोधन प्रकल्पही त्यांनी पूर्ण केले आहेत. त्यामध्ये लोकदेव खंडोबा आणि वाघ्या-मुरळीचे जागरण, महाराष्ट्रातील भटक्या जमातींच्या बोलींचा अभ्यास त्याचबरोबर लघुसंशोधन प्रकल्पामध्ये मराठी तमाशा आणि वगनाट्य, मराठी दंतकथा, मोनोग्राफ ऑफ मराठी पोवाडा यांचा समावेश आहे. यामधील काही प्रकल्प ग्रंथरूपाने सादर झाले असून अभ्यासक्रमांमध्ये त्यांचा समावेश झालेला आहे .

लोकसाहित्यातील लुप्त होत असलेल्या अनेक घटकांमुळे या क्षेत्रात आजच्या तरुणांनी संशोधन करण्याची वृत्ती वाढविली पाहिजे, असे ते आवर्जून नोंद करतात. लोकसाहित्याचे संशोधन करत असताना मूळ हस्तलिखितांचा व्यवस्थित वापर करून त्यांचे जतनही त्यांनी केले आहे. सरांनी 'ऐकीव' नावाचा शाहिरी वाङ्मयाचा प्रकार उजेडात आणला आहे. बंगालमध्ये 'जत्रा' नावाचा जो रंगभूमीवरील सादरीकरणाचा प्रकार आहे त्या आधारावर त्यांनी रंगभूमीचा उगम शोधण्याचा केलेला प्रयत्न स्तुत्य असा आहे. खंडोबा, मंगसुळी, वाघ्या-मुरळी यांबाबतचे संशोधन करून महत्त्वपूर्ण मतेही त्यांनी मांडली आहेत. लोकसाहित्याच्या

## निमित्त

संशोधानासाठी त्यांनी महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, कर्नाटक या राज्यात भटकंती करून लोकसाहित्यातील अनेक उपासकांची माहिती उजेडात आणली आहे. लोककला प्रकारांवर महत्त्वपूर्ण संशोधन आणि कार्य केल्यामुळे त्याची दखल 'लोककला अकादमी' तसेच 'मॉडर्न थिएटर'नेही घेतली आहे. सरांच्या व्याख्यानातून नेहमीच लोकसाहित्यातील संशोधक तसेच चिकित्सक वृत्ती जाणवते. सेट-नेटच्या परीक्षेसाठीचे त्यांचे मार्गदर्शन, पीएचडीच्या संशोधानासाठी दुर्मिळ साधनसामग्रीचा वापर कसा करावा? याचे विस्तृत विवेचन त्यांनी संशोधक विद्यार्थ्यांसाठी केले आहे, आजही करताहेत.

डॉ. शिंदेसरांच्या संशोधक, चिकित्सक आणि समीक्षक वृतीची जाणीव त्यांच्या लोकसाहित्यमीमांसा, शाहिरी वाङ्मयाच्या धारा, शोधयात्रा रंगभूमीची,लोकसाहित्य : संशोधन आणि समीक्षा, पारंपरिक मराठी तमाशा, मराठी ऐकीव, मराठी शाहिरी पोवाडा यांसारख्या ग्रंथातून होते. त्यांच्या लेखनाची सुरुवात वयाच्या चौदाव्या वर्षी झाल्याचे दिसते. त्यांचा 'भटकी जमात : कुडमुडे जोशी,' हा उपेक्षित समाजावर लिहिलेला पहिला लेख १९८५ मध्ये 'नवभारत ' मध्ये प्रकाशित झाला. लोकसाहित्यमीमांसा १, २ या ग्रंथातून लोकसाहित्याचे स्वरूप, परंपरा, मराठी लोकगीत, विविध व्याख्या, लोकसाहित्य अभ्यासाचे विविध संप्रदाय, लोकसंस्कृती, लोककथा लोकसाहित्य संशोधनाच्या नव्या दिशा याबद्दल त्यांनी विस्तृत विवेचन केले आहे.

'मराठी ऐकीव'मध्ये सातशे वर्षांपूर्वी ऐकीव सादर होत असल्याचा पुरावा त्यांनी दिला आहे. लावणी, पोवाडा यांसारख्याच लोककथा प्रकारांतील ऐकीव हा प्रकार असल्याचे संशोधन त्यांनी केले आहे. 'लोकसाहित्य : संशोधन आणि समीक्षा,' यामधून संशोधन कसे करावे याबद्दल नेमकेपणाने लिहिले आहे. यात लोकसंस्कृती, लोकदैवत, लोकसाहित्य आणि साहित्य, लोकरंगभूमी व नाटक यांची समीक्षा केलेली जाणवते. 'शाहिरी वाङ्मयाच्या धारा'मधून शाहीर भिलवडीकर यांची माहिती देऊन पोवाड्याचे स्वरूप, तमाशा, मावशी या पात्राचा शोध, सत्यशोधकी जलसा, सतीची लावणी, विनोद यांवरती लेखन केले आहे. 'शोधयात्रा रंगभूमीची,' यामधून वेगवेगळ्या नाट्यरुपाच्या आविष्कारातून कन्नड-मराठी संस्कृतीच्या संगमाचे दर्शन घडते. यामध्ये महाराष्ट्र व कर्नाटक या राज्यातील नाट्यरूपाचा शोध त्यांनी घेतला आहे.

डॉ. शिंदे यांच्या गौरव समारंभानिमित्त 'लोकसाहित्य :जीवन आणि संस्कृती,' हा ग्रंथ प्रकाशित होत आहे. डॉ.महेश खरात, डॉ. गजानन अपिने यांनी या ग्रंथाचे संपादन केले आहे. यामध्ये हरीश्चंद्र थोरात, गणेश देवी, नागनाथ कोत्तापल्ले, रंगनाथ पठारे, वसंत आबाजी डहाके, प्रकाश खांडगे, दत्ता भगत, प्रल्हाद लुलेकर, साहेब खंदारे यांसारख्या नामवंतांनी लेख लिहिलेले आहेत.

सरांनी अनेक राष्ट्रीय, राज्य पातळीवरील चर्चासत्राचे आयोजन केले आहे. विविध विद्यापीठाच्या अभ्यास मंडळांबरोबरच शासनाच्या अनेक समित्यांवर विविध पदे भूषविली आहेत. त्यांच्या ग्रंथांना राज्य सरकारच्या यशवंतराव चव्हाण पुरस्काराबरोबरच इतरही महत्त्वाचे पुरस्कार मिळाले आहेत. माचीगड तसेच कुद्रेमानी(कर्नाटक) येथील साहित्य संमेलनाचे अध्यक्षपदही त्यांनी भूषविले होते.

ते शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागातून सेवानिवृत झाले असले तरी निवृत्तीनंतरही ते संशोधन कामात व्यस्त असतात. त्यांच्या आजवरच्या कामाचे फलित म्हणजे त्यांना नुकतीच विद्यापीठ अनुदान आयोगाने 'इमेरिटस प्रोफेसर' म्हणून मान्यता दिली असून शिष्यवृत्तीही मंजूर केली आहे. अशा या साक्षेपी संशोधकाने लोकसाहित्यात स्वत:ची एक वेगळी मुद्रा उमटविली आहे.

● प्रा. डॉ. विनोद कांबळे